स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
नॅक 'B++' दर्जा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव्य विद्याशाखेंतर्गत राज्यशास्त्र विषयातील, पीएच.डी. पदवीकरिता सादर करावयाचा

संशोधन आराखडा

"महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीचा अभ्यास: विशेष संदर्भ परभणी जिल्हा (कालखंड २०१० ते २०२०)"

संशोधक

अजित संजिवन गुट्टे

रा.अंतरवेली ता.गंगाखेड जि.परभणी

मार्गदर्शक

प्रा.डॉ.बापुराव आंधळे

राज्यशास्त्र विभाग

कै. रमेश वरपुडकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, सोनपेठ,
ता.सोनपेठ, जि.परभणी

२०२३

“महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीचा अभ्यास: विशेष संदर्भ परभणी जिल्हा (कालखंड 2010 ते 2020)”

1.1 प्रस्तावना (Introduction):

आजच्या या संगणकीय युगात भारत देश प्रगतीचे प्रमाण मानले गेलेल्या अंतराळ, माहिती तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, वैद्यकशास्त्र इत्यादी अशा सर्वच क्षेत्रात लक्षणीय प्रगती करत आहे. शेकड़ो वर्षे परकीय राजवटीच्या अमलाखाली पिचलेल्या एखाद्या राष्ट्राने असा उत्कर्ष करणे खरंतर आव्हानच असते. परंतु स्वातंत्र्यानंतर स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूलभूत मूल्य संकल्पनेवर आधारलेल्या राज्यघटनेचा स्वीकार करून कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेवर आधारित नवभारताची निर्मिती करण्याचे ठरविले. जलदगतीने आर्थिक विकास साध्य करण्यासाठी 1951 पासूनच आर्थिक नियोजनाच्या मार्गाचा अवलंब करण्यात आला. देशाच्या विकासात समतोल आणि संतुलन साध्य करण्यासाठी सरकारने विविध कार्यक्रम व धोरणांच्या माध्यमातून भारत निर्माण करण्यासाठी केलेले आजपर्यंतचे प्रयत्न नाकारता येत नाही. याची फलश्रुती अशी की, आपला देश आज जगात पहिल्या पाच मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये गणला जात आहे. तद्‌वतच उत्पादन आणि विज्ञानाच्या सर्वच क्षेत्रात भारताने स्वतःचे अग्रगण्य स्थान निर्माण केले आहे.

एकीकडे भारत देश प्रगतीच्या प्रत्येक कक्षेला कवेत घेत असतानाच दुसरीकडे गरिबी, बेरोजगारी, विषमता व अज्ञान या समस्या भारतात आजही तितक्याच जटील बनलेल्या आहेत. जितकी स्वातंत्र्याच्या वेळी स्वातंत्र्यप्राप्तीची समस्या होती. देशाची लोकसंख्या ज्या प्रमाणात वाढते आहे, त्याहीपेक्षा गरिबी, बेरोजगारी वाढण्याचा दर जास्त दिसून येत आहे. देशापुढे आ

वासून बसलेल्या या समस्यांचे दुर्भिक्ष्य देशाच्या ग्रामीण भागात तर गणतीच्या पलीकडे गेलेले आहे.

भारत देश गावांचा देश आहे. भारतातील गावांविषयी सततच वैश्विक आकर्षण राहिलेल आहे. ग्रामीण भारतामध्ये आजही 62.2% लोकसंख्या (जनगणना 2011) वास्तव्यास आहे. ग्रामीण भागातील जनजीवन शेतीवर अवलंबून असते व भारतातील शेती मुख्यतः हंगामी पावसावर अवलंबून असल्याने कृषी कामांच्या पश्चात बेरोजगारीचा सामना करावा लागतो. भारतीय समाजामध्ये दारिद्र्य ही एक भीषण समस्या निर्माण झालेली आहे. या दारिद्र्यातूनच उपासमार, भूकबळी, कुपोषण, आत्महत्या असे अनेक गंभीर प्रश्न जन्माला आले आहेत. जगण्याच्या हक्काला अर्थ प्राप्त व्हायचा असेल, तर पोटापाण्याची व्यवस्था लावणे आवश्यक आहे. डॉ. अमर्त्य सेन यांच्या मताप्रमाणे दारिद्र्याचे प्रमुख कारण म्हणजे लोकांमध्ये क्रयशक्तीचा अभाव असणे. यातून अर्थबोध होतो की, लोकांची क्रयशक्ती वाढल्या खेरीज गरिबी, बेरोजगारी, विषमता व अज्ञान या गोष्टींचे उच्चाटन होणार नाही. शासनातर्फे सामाजिक व आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्या जाती-जमाती, दुर्बल घटक यांच्याकरिता कित्येक योजना राबवल्या जात आहेत. उद्देश हाच असतो की, त्यांचे जीवनमान उंचावले गेले पाहिजे. भारतासमोरील या दुष्टचक्रावरती काही प्रमाणात का होईना रोजगार निर्मिती हाच पर्याय प्रत्ययास येतो.

भारतीय राज्यघटनेत सुद्धा भाग 4 कलम 36 ते 51 मधील मार्गदर्शक तत्वानुसार सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी प्रत्येकास रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न शासनाने करावा असे तत्त्व नमूद केलेले आहे. नियोजनाच्या सुरुवातीपासूनच दारिद्र्याच्या निर्मूलनाचा संबंध रोजगाराशी जोडून विविध योजना, धोरणं राबविण्यात आले, तरी पण अपेक्षित यश आले नाही. परंतु काही प्रमाणात का होईना या सर्व समस्यांवर संजीवनी म्हणून

जिची महत्ता नाकारता येत नाही अशी केंद्र शासनाची दारिद्र्य व बेरोजगारी कमी करण्यासाठीची व त्यातून ग्राम विकासाचा महामेरु घडवून आणणारी “महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना” जिला ‘Silver Bullet’ म्हणून संबोधण्यात येते. ही योजना ग्रामीण भागातील गरजूंना उदरनिर्वाहासाठी पर्यायी स्त्रोत पुरवते जो की, स्थलांतर कमी करणे, दारिद्र्य कमी करणे व गाव-खेड्यात उत्पादक साधनांची निर्मिती करून गाव-खेड्यांना स्वावलंबी बनविणे यावर परिणाम करते. म्हणून तिला जगातील सर्वात मोठा ‘Anti Poverty’ कार्यक्रम समजण्यात येतो. ही योजना ग्रामीण भागातील अकुशल मजूर, दुर्बल घटक इतर उपेक्षित तसेच महिलांना त्यांच्या परिसरातच मागेल त्याला काम या तत्त्वावर रोजगार उपलब्ध करून देते. त्यांच्या उत्पन्नात व उपभोगात वाढ घडवून आणून त्यांचे जीवनमान उंचावते. अशाप्रकारे दीन-दुबळे, दलित, दुर्बल घटक, सीमांत व अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर तसेच महिला इत्यादी यांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती सुधारण्याचे काम या योजनेच्या माध्यमातून केले जात आहे.

भारतातील साडे सहा लाखांपेक्षा अधिक व महाराष्ट्रातील 43 हजारांपेक्षा अधिक गाव-खेड्यातील दुर्बल समुदायाच्या जगण्याचा हक्क व रोजगाराचा हक्क या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. या सर्वसामान्यांच्या उदरनिर्वाहासाठीच्या प्रश्नांची सोडवणूक ही रोजगार पुरवून व त्यातून समृद्ध होणारा गाव विकास कसा घडवून आणता येतो, हे अभ्यासण्याकरिता प्रस्तुत संशोधन विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना जिची पूर्वपिटिका अशी की महाराष्ट्राचे तात्कालीन विधान परिषद अध्यक्ष वि. स. पागे यांनी 1969 ला एक योजना आखली व प्रयोगासाठी ती सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यात विसापूर या गावात सुरू केली. पुढे ही तेथेच आजूबाजूच्या 8 गावांमध्ये सुरू केली. या योजनेमुळे ग्रामीण भागातच मजुराला

रोजगार मिळू शकतो व त्यातून समृद्ध गाव विकासही घडून येऊ शकतो हे या कार्यक्रमाने दाखवून दिले. म्हणूनच प्रथम प्रयोग म्हणून 1970 मध्ये राज्याच्या काही भागात ही योजना लागू केली.

भारतीय संविधानात कलम 41 मध्ये प्रत्येक नागरिकास काम देण्याचे मार्गदर्शक तत्व शासन व्यवस्थेस निर्देशित केले आहे. हे तत्व लक्षात घेऊन राज्यशासनाने मार्च 1972 मध्ये रोजगार हमी योजना संपूर्ण महाराष्ट्र राज्यात लागू केली. पुढे योजनेचे उद्देश, कार्यपद्धती ठरवून ही चालू राहण्यासाठी स्वतंत्र उपकर बसवून 1977 मध्ये रोजगार हमी योजना कायदा करण्यात आला. ज्याचा अंमल 26 जानेवारी 1979 पासून करण्यात आला. महाराष्ट्रात गेल्या 36 वर्षांपासून सुरू असलेल्या या योजनेचे यश पाहून याच धर्तीवर केंद्रशासनाने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम 2006 या वर्षी लागू केला. सुरुवातीला 2 फेब्रुवारी, 2006 पासून देशाच्या 200 जिल्ह्यांमध्ये ही योजना राबविण्यास सुरुवात केली. नंतर पुढे 1 एप्रिल 2008 पासून देशाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये ही योजना लागू केली गेली. 2 ऑक्टोबर 2009 ला या योजनेचे "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना" असे नामकरण करण्यात आले.

या योजनेचे गरजूंना त्यांच्याच परिसरात "मागेल त्याला काम" या तत्त्वावर दरवर्षी 100 दिवसांच्या कामाची हमी केंद्र शासन देते, तर उर्वरित 265 दिवसांची हमी राज्यशासन देते. काम मागितल्यापासून 15 दिवसांत काम दिले नाही, तर कायद्यानुसार दैनंदिन रोजगार भत्त्यावर मजूर दावा करू शकतो. कामाच्या ठिकाणी सुद्धा योग्य त्या सोयी सुविधा पुरवल्या जातात. स्त्री-पुरुषांना समान रोजगार दिला जातो. रोजगारासाठी अर्ज केलेल्यांपैकी एक तृतीयांश महिला असणे गरजेचे असते. इत्यादी उद्दिष्टे आहेत. मनरेगा योजना गेल्या 17 वर्षांपासून देशात राबविली जात आहे. व्यवस्थापन बदल घडविण्यासाठी मूलगामी आणि विवेकी पाऊल कसे उचलले जाऊ शकते याचे उत्तम उदाहरण ही योजना आहे. योजनेमुळे

गरीब व अति गरिबांना भूक आणि वंचनेपासून मुक्तीचे साधन दिले. “अभिसरणातून विकासाकडे” हे ब्रीद खऱ्या अर्थाने या योजनेतून सार्थक ठरताना दिसत आहे.

रोजगार हमी योजनेतून त्यांच्या गाव परिसरातच रोजगाराची हमी देतानाच त्यातून गाव विकासाची कामे घडविण्याची व्यवस्था करण्यासाठी कायदा करणारे महाराष्ट्र देशातीलच नव्हे, तर जगातील पहिले राज्य आहे. अन्य कोणत्याही योजनांपेक्षा मनरेगा वेगळी योजना आहे. कारण ही फक्त योजना नसून, कायदा सुद्धा आहे. ज्यामुळे गरजू काम मागू शकतो व शासनाने काम दिले नाही, तर दैनंदिन भत्त्यावर दावा करू शकतो. “गरिबी न्याय से खत्म होती है, दान से नही !” या नेल्सल मंडेलांच्या उक्तीला साजेशीच ही योजना आहे. ग्रामीण विकासाचे इंजिन बनून पुढे येणारी ही योजना अन्य कायद्यांपेक्षा लोकांचा, लोकांनी व लोकांसाठी तयार केलेला महत्त्वपूर्ण कायदा आहे. ही जगातील सर्वात मोठी सामाजिक कल्याणकारी योजना आहे. म्हणूनच या योजनेने राज्यशास्त्राच्या अभ्यासकांचे लक्ष वेधले आहे. तुलनात्मक दृष्टीने विकासात मागासलेला, आत्महत्याग्रस्त व दुष्काळ प्रवणक्षेत्र अशी ओळख असलेल्या मराठवाड्यात परभणी एक जिल्हा आहे. यावरूनच आपल्याला जिल्ह्यातील गरिबी व दारिद्र्य लक्षात येईल. परभणी जिल्ह्यात जनगणना 2011 नुसार 848 वस्ती असलेले गावे आहेत. केंद्र शासनाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा जिल्ह्यातील दुर्बल घटक, गरजू उपेक्षितांना किती फायदा झाला. याचा सविस्तर अभ्यास प्रस्तुत विषयाला अनुसरून असणाऱ्या संशोधनात केला जाणार आहे.

1.2 साहित्याचा आढावा (Review of Literature):

संदर्भ साहित्य हा संशोधनाचा कणा असतो कारण संदर्भ साहित्य म्हणजे मागच्या व पुढच्या सामुग्री लेखनाचा संबंध जोडणे व संशोधन विषयासंदर्भात पूर्वीचे शोध नवनवीन संशोधन यात पडताळणी करण्यासाठी संदर्भ आवश्यक असते. कारण हा संबंध

जोडल्याशिवाय याचा खरा अर्थ समजत नाही. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेवर उपलब्ध साहित्याचे अवलोकन केल्यावर या संशोधन विषयासंदर्भात अधिक संशोधनाची गरज असल्याचे जाणवते.

1. वि. स. पागे (1975)

वि. स. पागे यांनी डिसेंबर 1978 मध्ये लोकराज्य या अंकात लेख प्रकाशित केला. या लेखात त्यांनी रोजगार हमी योजनेच्या निर्मिती मागील भूमिका विशद केली आहे. तसेच त्यांच्या मते या योजनेमुळे रोजगारात वाढ झाल्याने काही अंशी दारिद्र्य कमी होण्यास मदत झाली आहे. स्त्री-पुरुष यांना समान वेतन मिळू लागल्याने ही योजना ग्रामीण भागात नव संजीवनी ठरत आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागात बेरोजगारीला पर्याय उपलब्ध झाल्यामुळे कर्जबाजारीपणाचे निर्मूलन होऊ शकते.

2. काळे भाऊसाहेब (2014)

प्रस्तुत “महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना” या पुस्तकात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अधिनियमांसंदर्भात तपशीलवार माहिती दिलेली आहे. मनरेगा योजनेचा लाभ घेण्यासाठी काय पात्रता आहेत, रोजगाराबद्दलचे नियम, अटी, महिलांसाठी रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत मार्गदर्शक सूचना, योजनेचे संनियंत्रण, अधिकाऱ्यांचे हक्क, अधिकार, कर्तव्य, कामाचे मोजमाप व मनरेगा अंतर्गत येणाऱ्या कामांचा तपशील दिलेला आहे.

3. गायकवाड अशोक नारायण (2015)

संशोधक गायकवाड़ अशोक नारायण यांनी “मराठवाड्यातील रोजगार हमी योजनेची ग्रामीण विकासातील भूमिका एका अभ्यास” हा शोधप्रबंध जुलै 2015 साली पीएच.डी.

पदवीसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे सादर केला आहे. सदर संशोधन हे मराठवाड्यातील रोजगार हमी योजनेची कामे ज्या गावात चालू होती अशी गावे निवडून त्या गावातील कामावर असलेल्या मजुरांची निवड माहिती संकलनासाठी केली आहे. त्यानुसार बेरोजगार गरजू मजुरांची संशोधनासाठी निवड केली आहे व संशोधकाने योजनेसंदर्भात महत्त्वपूर्ण निष्कर्ष मांडले आहेत.

4. श्री मनोज पाटील (केंद्र व राज्यशासनाच्या विकास योजना)

मनोज पाटील यांनी नागरिकांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विकास योजना हे पुस्तक लिहून यामध्ये "महाराष्ट्र राज्य ग्रामीण रोजगार हमी योजना" व "महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना" याबाबतचे विवेचन केले आहे.

5. शिवाजी भ. यादव (ग्रामपंचायत वित्त व योजना)

शिवाजी भ. यादव यांनी ग्रामपंचायत वित्त व योजना हे पुस्तक लिहून भारतातील ग्रामपंचायतीचा विकास त्यात त्यांनी स्वातंत्र्यपूर्व कालखंड, स्वातंत्र्योत्तर कालखंड व विविध योजनांचा अभ्यास केला आणि त्यांनी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची सुरुवात व अंमलबजावणीचे विवेचन केले आहे.

1.3 संशोधन समस्या (Formulation of Problem):

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही भारत सरकारची अतिशय महत्त्वपूर्ण व महत्त्वकांक्षी योजना आहे. या योजनेची माहिती व अभ्यास होणे गरजेचे आहे. या योजनेअंतर्गत कामाचे नियोजन कसे केले जाते. मजुरी व कामासाठी निधी कशाप्रकारे उपलब्ध करून दिला जातो. ही योजना परभणी जिल्ह्यातील लाभार्थ्यांपर्यंत पोहोचली आहे का? योजनेअंतर्गत संपन्न झालेली कामे व त्यावर झालेला खर्च यांच्या ताळेबंदाविषयी विवेचन

करणे. लाभार्थ्यांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीत काही सुधारणा झाली आहे का? गरजू व्यक्तींना त्यांच्या परिसरात रोजगाराची संधी उपलब्ध होत आहे का? गाव विकासाच्या कोणकोणत्या शाश्वत कामांची यातून निर्मिती होत आहे? ही योजना राबविताना कोणकोणत्या समस्या आल्या? या योजनेच्या अंमलबजावणीत कोणत्या उणिवा आहेत? इत्यादी समस्या जाणून घेण्यासाठी संशोधकाने "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीचा अभ्यास: विशेष संदर्भ परभणी जिल्हा (कालखंड 2010 ते 2020)" हा विषय निवडलेला आहे.

1.4 संशोधनाची निवड (Selection of Topic):

संशोधन ही प्रगतीची जननी असल्यामुळे संशोधन जर समाजोपयोगी नसेल, तर समाजाची प्रगती होऊ शकत नाही. त्यामुळे संशोधनासाठी निवडलेला "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीचा अभ्यास: विशेष संदर्भ परभणी जिल्हा (कालखंड 2010 ते 2020)" हा विषय परभणी जिल्ह्यातील ग्रामीण भागातील भूमीहीन शेतमजूर, सीमांत व अल्पभूधारक शेतकरी, दुर्बल घटक, अकुशल कामगार यांना त्यांच्या परिसरात रोजगार उपलब्ध करून देतानाच त्यातून गाव विकासाची कामे घडविण्याच्या व्यवस्थेवर प्रकाश टाकण्याच्या दृष्टिकोनातून हा विषय निवडला गेला आहे.

1.5 संशोधनाचे महत्त्व (Importance of Research):

समाजातील उपेक्षित लोकांकरिता शासन वेगवेगळ्या योजना राबवीत असते. उद्देश हाच असतो की, या योजनांचा या उपेक्षितांना फायदा होऊन त्यांचे जीवनमान उंचावले गेले पाहिजे. देशाला स्वातंत्र्य प्राप्त होऊन 76 वर्षे उलटली तरीही ग्रामीण भागातील भूमीहीन शेतमजूर, सीमांत व अल्पभूधारक शेतकरी व दुर्बल घटक तसेच महिला यांची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारलेली नाही. या उपेक्षितांच्या किमान गरजा पूर्ण व्हाव्यात त्यांचे जीवन

सुसह्य व्हावे यासाठी शासन विविध योजना राबवीत आहे. “महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना” ही देखील अशीच योजना आहे. या योजनेदवारे समाजोपयोगी कामामुळे उत्पादकता वाढून स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

ग्रामीण भागात शाश्वत उत्पादकता वाढवणारी व ग्रामीण भागात गरजूंना, उपेक्षितांना रोजगाराची व स्वाभिमानाने जगण्याची संधी देणारी योजना म्हणून या योजनेला विशेष महत्त्व आहे. या योजनेच्या प्रारंभापासून मजुरांना स्थानिकपातळीवरच रोजगार मिळू लागल्याने त्यांची रोजगारासाठीची होणारी वणवण थांबली. मजुरीच्या पलीकडे ग्रामीणविकासाचा संदर्भ या योजनेला आहे. म्हणून ग्रामविकासात अनन्यसाधारण महत्व या योजनेला आहे. ग्रामीण भागातून शहराकडे स्थलांतर रोखण्यात ही योजना महत्वपूर्ण ठरली आहे. म्हणूनच या योजनेच्या माध्यमातून परभणी जिल्ह्यातील उपेक्षित वर्गामध्ये कोणता बदल घडून आला याचा अभ्यास करणे संशोधकाला महत्त्वाचे वाटते.

1.6 संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of Research) :

सामाजिक संशोधनाचा उद्देश हा सामाजिक घटनांच्या बाबतीत नवीन ज्ञानाची प्राप्ती करणे, सामाजिक घटनांमधील प्रकार्यात्मक संबंधाचा शोध घेणे, शास्त्रीय संकल्पनांची निर्मिती करणे, जुन्या नियमांचे परीक्षण मानवी जिज्ञासेच्या समाधानासाठी केले जाते. अशाप्रकारे नवीन तथ्याचे ज्ञान मिळविणे व जुन्या तथ्यांचे पुनर्परीक्षण करून सामाजिक घटनांच्या बाबतीत ज्ञान हे गतिशील करणे हा संशोधनाचा मूलभूत उद्देश आहे. प्रस्तुत संशोधनासाठी विशिष्ट उद्दिष्टे समोर ठेवून “महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीचा अभ्यास विशेष संदर्भ परभणी जिल्हा (कालखंड 2010 ते 2020)” हा विषय संशोधनासाठी निवडला असून, त्या अनुषंगाने संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहेत.

1) मनरेगा योजनेची व्याप्ती, उद्दिष्टे व अंमलबजावणीचे अध्ययन करणे.

2) मनरेगा योजनेच्या केंद्र व राज्यशासनाच्या वित्तीय व्यवस्थेचे विश्लेषण करणे.

3) मनरेगा योजनेच्या परभणी जिल्ह्यातील लाभार्थ्यांवर झालेल्या सामाजिक व आर्थिक परिणामांचा अभ्यास करणे.

4) मनरेगा योजनेअंतर्गत परभणी जिल्ह्यात करण्यात आलेल्या विविध कामातून ग्राम - विकासातील योगदानाचा अभ्यास करणे.

5) मनरेगा योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

1.7 संशोधनाची गृहितके (Hypothesis of Research):

गृहितकाच्या आधारावर सत्याचा शोध घेतला जातो. गृहितके ही संशोधनास दिशा दाखविण्याचे कार्य करत असल्याने गृहितके अंतिम सत्य आहेत, असे मानता येणार नाही. संशोधकाचे लक्ष विचलित न होता आपल्या संशोधन कार्यास मर्यादित करून गृहितकांच्या अनुषंगाने संशोधन विषयांच्या एका विशिष्ट पैलूवर लक्ष केंद्रित करून संबंधित तथ्यांना एकत्रित करावे लागते.

संशोधनात गृहीतकांची निर्मिती केल्यामुळे संशोधन कार्य एका निश्चित दिशेने सत्याचा शोध घेण्याचे कार्य करते. “महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीचा अभ्यास: विशेष संदर्भ परभणी जिल्हा (कालखंड 2010 ते 2020)” या विषयाचे संशोधन करत असताना संशोधन विषयाला अनुसरून पुढील गृहितकृत्ये निश्चित करण्यात आली आहेत.

1) मनरेगा योजनेच्या लाभार्थी कुटुंबाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीत सुधारणा झाली आहे.

2) मनरेगा योजनेमुळे वर्षे 2010 ते 2020 या कालखंडामध्ये परभणी जिल्ह्याचा विकास झाला आहे.

3) मनरेगा योजनेअंतर्गत परभणी जिल्ह्यातील लाभार्थ्यांना दिली जाणारी मजुरी व बाजार वस्तू मूल्य यांच्यात योग्य तो समन्वय नाही.

4) मनरेगा योजनेच्या कामांमध्ये परभणी जिल्ह्यातील लाभार्थ्यांचा सहभाग वाढला आहे.

5) मनरेगा योजनेच्या व्यवस्थापन कार्यप्रणालीत सुधारणा करणे गरजेची आहे.

1.8 संशोधन पद्धती (Research Methodology):

संशोधक संशोधनाच्या विविध पद्धतींपैकी क्षेत्रीय सर्वेक्षणात्मक, विश्लेषणात्मक व सांख्यिकी संशोधन पद्धतीचा आधार घेऊन संशोधन विषयाची मांडणी करण्यात येणार आहे.

1.9 तथ्य संकलन (Data Collection):

सामाजिक संशोधनामध्ये तथ्ये संकलनाला महत्त्वाचे स्थान असल्याने संशोधन कार्याचा प्रारंभ आणि शेवट तथ्यांच्या आधारानेच होत असतो. म्हणजेच तथ्ये संकलन हा संशोधन कार्याचा आत्मा आहे. घटनेच्या संदर्भात वास्तविक तथ्ये संकलित करून त्या आधारावर नवीन सिद्धांतांचे प्रतिपादन केले जाते. त्यामुळेच संशोधनांमध्ये तथ्य संकलनाला विशेष महत्त्व आहे. संपूर्ण संशोधन कार्य हे तथ्य संकलनावरच अवलंबून असते.

तथ्य संकलन करण्यासाठी संशोधनामध्ये प्रामुख्याने दोन स्त्रोतांचा अवलंब केला आहे. “महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीचा अभ्यास: विषय संदर्भ परभणी जिल्हा कालखंड 2010 ते 2020” या प्रस्तुत विषयाच्या अभ्यासासाठी प्राथमिक व दवितीय स्त्रोतांचा आधार घेण्यात येणार आहे.

प्राथमिक स्त्रोत : म. गां. रा. ग्रा. रो. ह. योजनेसंबंधी सर्व माहिती संकलित करण्यासाठी मुलाखत व अनुसूची पद्धतीचा उपयोग करून तथ्ये संकलन केले जाणार आहे.

द्वितीय स्त्रोत : म. गां. रा. ग्रा. रो. ह. योजनेसंबंधी अनेक अभ्यासकांनी लिहिलेली पुस्तके, सरकारी वार्षिक अहवाल, परिपत्रके, लेखा परीक्षण अहवाल, वर्तमानपत्रातील लेख, संशोधन विषयासंबंधी संशोधन अहवाल, इंटरनेट इ. स्त्रोतांचा आधार घेण्यात येणार आहे.

1.10 संशोधनविषयाची व्याप्ती व मर्यादा (Scope and Limitation of Research):

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही केंद्र शासनाच्या माध्यमातून सुरू असून या योजनेचा विस्तार संपूर्ण भारतभर झालेला आहे. त्यामुळे संपूर्ण देश या योजनेची व्याप्ती असल्यामुळे संपूर्ण देशातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा अभ्यास करणे अशक्य आहे. म्हणून संशोधन हे अधिक सखोल व अनुभवजन्य होण्याच्या दृष्टीने सदर संशोधनासाठी "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीचा अभ्यास : विशेष संदर्भ परभणी जिल्हा कालखंड 2010 ते 2020" हा विषय निवडलेला आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये परभणी जिल्ह्यातील ग्रामीण भागातील भूमीहीन शेतमजूर, सीमांत व अल्यभूधारक शेतकरी, दुर्बल घटक तसेच महिला इ. लाभार्थ्यांस झालेला फायदा व त्यातून होणारा गावांचा विकास याचा अभ्यास करावयाचा आहे.

"महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीचा अभ्यास : विशेष संदर्भ परभणी जिल्हा (कालखंड 2010 ते 2020)" या विषयाला योग्य व परिपूर्ण न्याय देता यावा यासाठी अभ्यास विषयाचा कालावधी 2010 ते 2020 हा घेतला असून, संशोधनाची मर्यादा केवळ परभणी जिल्ह्यापुरती मर्यादित आहे.

1.11 नमुना निवड (Sampling):

संशोधन कार्य पुर्ण करण्यासाठी संबंधीत परिक्षेत्रातील लाभार्थी, अधिकारी, पदाधिकारी, तसेच नागरीकांकडून मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून माहिती संकलीत

करावयाची असून यासाठी परभणी जिल्ह्यातील योजनेचे लाभार्थी, संबंधित अधिकारी व नागरीक यांच्या कडून मुलाखत-अनुसुची भरून घेण्यात येणार आहे. सदर संशोधन कार्यासाठी परभणी जिल्ह्यातील एकूण 9 तालुक्यांतील प्रत्येकी 10 गावे निवडण्यात येणार आहेत. त्या तालुक्यांतील गावांची निवड त्या तालुक्यातील प्रत्येक सर्कल मधुन दोन गावे निवडून केली जाणार आहे. निवडलेल्या त्या प्रत्येक एका गावातून 25 लाभार्थी, अधिकारी व नागरीक अशा स्त्री व पुरूष समप्रमाणात एकूण 2,250 जणांच्या मुलाखत व अनुसुची भरून घेण्यात येणार आहेत. या बरोबरच परभणी जिल्ह्यातील प्राप्त माहितीचे विवेचन संशोधनकार्यात करण्यात येणार आहे. नमुना निवड करण्यासाठी संभाव्यता नमुना पध्दती अंतर्गत साधा यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा उपयोग करण्यात येणार आहे.

1.12 संशोधनाचे शीर्षक (Title of Research):

"महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीचा अभ्यास: विशेष संदर्भ परभणी जिल्हा (कालखंड 2010 ते 2020)"

1.13 प्रकरणांची मांडणी (Chapter Scheme):

1) प्रस्तावना व संशोधन पद्धती

2) परभणी जिल्ह्याचा आर्थिक, सामाजिक व राजकीय आढावा

3) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची कार्यपद्धती आणि फलनिष्पत्ती

4) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या सर्वेक्षित तथ्यांचे विश्लेषण व सादरीकरण

5) निष्कर्ष व शिफारशी

संदर्भसूची (References):

पुस्तके :

1) वि. स. पागे, (1979), बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

2) शिवाजी भ. यादव (2014), ग्रामपंचायत वित्त व योजना, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद

3) मनोज पाटील, (2009), नागरिकांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विकास योजना, चौधरी लॉ पब्लिशर्स, पुणे

4) भाऊसाहेब काळे, (2014), महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

5) दांडेकर आणि रथ (1979), भारतातील दारिद्र्य, समाज प्रबोधन संस्था, पुणे

6) भारत गोरे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अप्रतिम प्रकाशन, औरंगाबाद

7) सुधीर बिरजे, (2020), महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, 1977, अजित प्रकाशन, पुणे

8) सांगळे भगवान, (2011), ग्रामीण विकास योजना: दशा आणि दिशा, चतुरंग प्रकाशन, पुणे

अहवाल:

1) भारत सरकार आर्थिक पाहणी अहवाल, 2022-23

2) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, अर्थ व सांख्यिकी संचालनालय महाराष्ट्र शासन, मुंबई, सन 2022

शोध प्रबंध (Ph.D. Thesis):

1) सोडनवर मनीषा, (2017), "महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेची कार्यपद्धती व्यवस्थापन आणि प्रभाव क्षमता एक अभ्यास", पीएच.डी. शोधप्रबंध, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

मासिके :

1) लोकराज्य

2) योजना

Web Reference:

1) www.nrega.nic.in

2) www.maharashtra.gov.in

3) https://en.wikipedia.org

4) https://rural.gov.in

5) https://zpparbhani.gov.in

संशोधक,

अजित संजिवन गुट्टे
रा. अंतरवेली ता. गंगाखेड जि. परभणी

मार्गदर्शक,

प्रा. डॉ. बापुराव आंधळे
राज्यशास्त्र विभाग
कै. रमेश वरपुडकर कला, वाणिज्य आणि
विज्ञान महाविद्यालय, सोनपेठ, जि.परभणी